# जळगांव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी लि.जळगांव

दिनांक २७/०७/२०२५

संस्थेची ११६ वी वार्षिक सर्व साधारण सभा रविवार दिनांक २७/०७/२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता संस्थेचे अध्यक्ष म.अजबसिंग सोनुसिंग पाटील यांचे अध्यक्षतेखाली झाली असता खालील प्रमाणे सदस्य हजर होते.त्या सभेचे इतिवृत्त.

हजर सभासद संख्या – २८,१४५ (अठ्ठाविस हजार एकशे पंचेचाळीस मात्र)
(नांवे स्वतंत्र रजिस्टर मध्ये नोंदलेली आहे.)

"सन्माननीय सभासद बंधु भगिनींनो आज आपल्या संस्थेच्या होत असलेल्या ११६ व्या वार्षिक सर्व साधारण सभेस आपण सर्वजण उपस्थित राहिलात त्या बद्दल मी सर्व प्रथम आपणा सर्वाचे हार्दीक स्वागत करतो."एवढे बोलुन म.अध्यक्ष सो.यांनी सभेचे कामकाजास सुरूवात केली.

सभेचे सुरूवातीस म.अध्यक्ष सो.यांनी शोक प्रस्ताव मांडला व रजिस्टर नुसार मयतांची नांवे सभेसमोर वाचुन दाखविणेत आलीत.

अहवाल वर्षात व आज अखेर भारतातील जे थोर नेते,संशोधक,तंत्रज्ञ,साहित्तीक,कलावंत,शिक्षण तज्ञ, सामाजिक व सहकार क्षेत्रतील कार्यकर्ते,संस्थेचे माजी संचालक,सभासद,कर्मचारी व सभासदांचे नातेवाईक, संस्थेचे हितचिंतक तसेच नैसर्गिक आपत्ती व विविध अतिरेकी कारवायांमध्ये शहीद झालेले नागरीक,पोलिस, सैन्य दलतील जवान तसेच संस्थेचे माजी अध्यक्ष कै.उत्तमराव माधवराव पाटील यांचे दुःखद निधन झालेले आहे.

त्यांचे आत्म्यास सद्‌गती प्राप्त व्हावी व शांती लाभावी म्हणुन आपण सर्वानी एक मिनिट स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करावयाची आहे.या घटनांचे गांभिर्य ठेवुन आजची सभा शांततेत पार पाडावी अशी आपणास विनंती करतो.

येणे प्रमाणे सर्व सभासदांची एक मिनिट स्तब्ध उभे राहुन मृतात्म्यास श्रध्दांजली अर्पण केली व तद्‌नंतर म.अध्यक्ष सो.यांनी प्रास्ताविक भाषण केले.

यानंतर आयत्या वेळेचे विषय असल्यास दयावेत असे म.अध्यक्ष सो.यांनी जाहिर केले व त्यानुसार खालील प्रमाणे आयत्या वेळेचे विषय स्विकारणेस आलेत.

१) संस्थेचे लवादी सभासद हे त्यांच्याकडील येणे असलेल्या थकित कर्जाची रक्कम एकरकमी परतफेड करणेस तयार असल्यास कर्जावरील येणे व्याजास सुट देणे बाबत विचार करणे.
२) म.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,जळगांव यांनी उपदान (ग्रॅच्युईटी) संबंधी पोटनियम दुरूस्ती नाकारल्याने संस्थेचे कर्मचाऱ्यांना पुर्ववत एका वर्षाच्या सेवाकाळासाठी २२ दिवसाची ग्रॅच्युईटीची रक्कम अदा करणे बाबत विचार करणे.
३) संस्थेचे अनियमीत व सतत गैरहजर राहणारे कर्मचाऱ्यांबाबत विचार करणे.
४) संस्थेचे थकबाकीदार सभासदांकरीता सुरू असलेल्या संजिवनी योजनेस मुदतवाढ देणे तसेच संस्थेचे थकबाकीदार व मयत सभासदांचे शासकिय/निमशासकिय सेवेत कार्यरत असलेले वारसांना संस्थेचे सभासद करून त्यांचेकडून थकबाकी वसुली करणे बाबत विचार करणे.

विषय क्र.१ दिनांक १८/०८/२०२४ रोजी जळगांव येथे झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेचा वृत्तांत वाचुन कायम करणे.

ठराव :– दिनांक १८/०८/२०२४ रोजी जळगांव येथे झालेल्या वार्षिक साधारण सभेचे इतिवृत्त सभासदांना पुरविणेत आलेले आहे.ते मुद्रण दोष दुरूस्तीसह कायम करण्यांत यावे.

सुचक :– श्री.अनिल फुलचंद पाटील
अनुमोदक :– श्री.गजानन नारायण माळी
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.२ दिनांक ३१/३/२०२५ अखेरचा नफा तोटा व ताळेबंद वाचुन मंजुर करणे.

ठराव :– दिनांक ३१/०३/२०२५ अखेरचा नफा–तोटा व ताळेबंद अहवालात दिल्याप्रमाणे मुद्रण दोष दुरूस्तीसह मंजुर करण्यांत यावा.

सुचक :– श्री.मनोज भरत पाटील
अनुमोदक :– श्री.अनिल वना पाटील
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.३ दिनांक ३१/३/२०२५ अखेर झालेल्या नफ्याची वाटणी कार्यकारी मंडळाने केली आहे.त्यास कार्योत्तर मंजुरी देणे.

ठराव :– दिनांक ३१/०३/२०२५ अखेर झालेला नफा रूपये १३,४९,९८,६२८.६७/– (अक्षरी रू.तेरा कोटी एकोणपन्नास लाख अठ्ठयाण्णव हजार सहाशे अठ्ठावीस पैसे सदुसष्ठ मात्र) नफा वाटणी कार्यकारी मंडळाने सुचविल्या प्रमाणे मंजुर करण्यांत यावी. सभासदांना १० % लाभांश ( डिव्हीडंड ) रक्कम आर. टी. जी. एस. / एन. ई. एफ. टी. /चेकने वाटप करण्यांत यावी व थकबाकीदार सभासदांच्या खात्यावर जमा करण्यांत यावी.

सुचक :– श्री.सतिष शिवाजी बोरसे
अनुमोदक :– श्री.निलेश निंबा पाटील
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.४ अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

ठराव :– सन २०२४/२०२५ या सालात संस्थेच्या अहवालात दर्शविल्या प्रमाणे जादा झालेल्या खर्चास मंजुरी देण्यात यावी.

सुचक :– श्री.सुधिर साहेबराव पाटील
अनुमोदक :– श्री.रविंद्र धर्मराज बोरसे
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.५ दिनांक ३१/३/२०२५ अखेरचा अहवाल वाचुन मंजुरी देणे.

ठराव :– दिनांक ३१/०३/२०२५ अखेरचा अहवाल सर्व सभासदांना पुरविण्यांत आला आहे.तो सभेसमोर वाचुन दाखविण्यात आला.सदर अहवाल मुद्रणदोष दुरूस्तीसह मंजुर करण्यांत यावा.

सुचक :— श्री.मनोज प्रकाश पाटील
अनुमोदक :— श्री.प्रमोद पंढरीनाथ चिलाणेकर
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.६ सन २०२५ — २०२६ चे जमाखर्चाचे अंदाजपत्रक मंजुर करणे.

ठराव :— सन २०२५/२०२६ चे जमा खर्चाचे अंदाज पत्रक कार्यकारी मंडळाने तयार केले आहे.त्याप्रमाणे ते मंजुर करण्यांत यावे.

सुचक :— श्री.कुंदन बळीराम वायकोळे
अनुमोदक :— श्री.राहुल एकनाथ भारंबे
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.७ सन २०२४ — २०२५ चा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल वाचुन दाखल करणे.

ठराव :— म.सुरेश एस.पाटील ॲन्ड कंपनी,चार्टर्ड अकौन्टंटस्,वैधानिक लेखापरिक्षक,जळगांव यांनी सन २०२४/२०२५ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण करून संस्थेकडेस वैधानिक (सरकारी) लेखापरिक्षण अहवाल सादर केलेला आहे.तो दाखल करण्यांत यावा व त्याची योग्य ती पुर्तता कार्यकारी मंडळाने करावी.

सुचक :— श्री.जितेंद्र रमेश गवळी
अनुमोदक :— श्री.लतिफ रफिक तडवी
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.८ सन २०२५ — २०२६ या वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे बाबत विचार करणे.

ठराव :— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८१ (१) (क) तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ च्या नियम ६९(१) अन्वये म.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांनी जा.क्र./सआ/अनिलेप/नामतालिका आदेश/ ३५४/१३ दिनांक ३०/०३/२०१३ रोजीचे परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांचे लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकाची नामतालिका तयार केलेली आहे.परिपत्रकातील अटी व शर्तीस अधिन राहुन सदर नामतालिकेत नियुक्त केलेल्या लेखापरिक्षकाकडून सहकारी संस्थांचे वर्गीकरणा नुसार लेखापरिक्षण करून घ्यावयाचे आहे.या बाबत सभेत चर्चा करण्यात आली.

आपली संस्था रू.१०० कोटी व त्यापेक्षा जास्त खेळते भांडवल असणाऱ्या पगारदार नोकरांची संस्था असल्यामुळे परिपत्रका नुसार आपल्या संस्थेचा समावेश "ब"या वर्गीकरणात होत आहे.त्यामुळे आपल्या संस्थेचे लेखापरिक्षण हे नामतालिकेवरील "अ" किंवा "ब"वर्गात समाविष्ट असणाऱ्या लेखा परिक्षकाकडून करून घेणे आवश्यक आहे.सन २०२५/२०२६ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करिता लेखापरिक्षक म्हणुन नियुक्ती होणे बाबतचे म. म.सुरेश एस.पाटील ॲन्ड कंपनी,चार्टर्ड अकौन्टंटस्,जळगांव यांचे दिनांक १५/०७/२०२५ रोजीचे पत्र संस्थेला प्राप्त झालेले आहे.सदरील पत्र सभेसमोर वाचुन दाखविण्यांत येवुन त्यावर सविस्तर चर्चा करणेत आली.

त्यानुसार “अ” वर्गात समाविष्ट असणारे लेखापरिक्षक म. म.सुरेश एस.पाटील अॅन्ड कंपनी,चार्टर्ड अकौन्टंटस्,जळगांव यांची उपरोक्त परिपत्रकातील अटी व शर्ती व महाराष्ट सहकारी संस्था अधिनियम १९६१ च्या नियम ६९ (१) अन्वये प्राप्त अधिकारास अधिन राहुन वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन नियुक्ती करण्यांत येत आहे.

त्यानुसार नियुक्त लेखापरिक्षकाचे संमतीसह प्रस्ताव म.जिल्हा उपनिबंधक साो. सहकारी संस्था जळगांव यांचेकडे सादर करण्यांत यावा.

सुचक :– श्री.अरूण शालिग्राम पाटील
अनुमोदक :– श्री.हरिशचंद्र संतोष पाटील
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.९ संस्थेच्या सन २०२४/२०२५ या आर्थिक वर्षात झालेल्या खर्चास मान्यता देणे बाबत विचार करणे.

ठराव :– सन २०२४/२०२५ या आर्थिक वर्षात दिनांक ०१/०४/२०२४ ते दिनांक ३१/०३/२०२५ अखेर झालेला खर्च कार्यकारी मंडळाने केलेला आहे.सदरील खर्च अहवालात नमुद करणेत आलेला आहे.सर्व खर्चाचा तपशिल सभेसमोर वाचुन दाखविणेत येवुन त्यास मंजुरात देणेत आली.

सुचक :– श्री.अनिल वसंत सुरडकर
अनुमोदक :– श्री.किशोर अशोकराव चव्हाण
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.१० अहवालात दिलेली पोटनियम दुरूस्ती मंजुर करणे.

ठराव :– सदरील विषय चर्चेअंती रद्द करणेत आला.त्यामुळे पोटनियम दुरूस्ती नाही.

विषय :– ११ संस्थेचा कर्मचारी आकृतीबंध व वेतनश्रेणीस मान्यता देणे बाबत विचार करणे.

ठराव :– संस्थेने वार्षिक साधारण सभा दिनांक ०४/०९/२०२२ मधील ठराव क्र.२० व कार्यकारी मंडळ सभा दिनांक २२/०१/२०२३ मधील ठराव क्र.१० नुसार संस्थेचे व सभासदांचे आर्थिक हिताचा विचार करून अनावश्यक कर्मचारी संख्येत घट करून कर्मचाऱ्यांसाठी नविन सुधारीत कर्मचारी आकृतीबंध संस्थेचे पोटनियम क्र.फ–१.९(३७) नुसार मंजुरीस्तव म.जिल्हा उपनिबंधक यांच्याकडेस पाठविणेत आला होता.सदरील आकृतीबंधास म.जिल्हा उपनिबंधक सह. संस्था, जळगांव यांचे कडील पत्र जावक क्र.२२०४/ युआरबी –२/ ज. जि. सर. नो. स.पत/ जळ/ सुधा. कर्म.आकृतीबंध/मान्यता/२०२३ दिनांक १३/०६/२०२३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच संस्थेचे मंजुर कर्मचारी सेवा प्रवेश,शिस्त व अपिल नियम क्र.५ व ६ नुसार संस्थेतील अधिकारी/कर्मचारी यांची पदनिहाय श्रेणी ,व पात्रता,वेतनश्रेणी व संख्या यांना वार्षिक सर्व साधारण सभा दिनांक २७/०८/२०२३ मधील ठराव क्र.११ अन्वये खालील प्रमाणे मान्यता प्रदान करणेत आलेली आहे.

| अ.नं. | पदाचे नांव | श्रेणी | पात्रता | संख्या | ७ वा आयोगानुसार वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापक | १ | पदवीधर, G.D.C.& A. | ०१ | एस-१५ - ४१,८००- १,३२,३०० |
| २ | विभागिय अधिकारी<br>लेखापाल<br>प्रशासन अधिकारी<br>कर्ज अधिक्षक<br>वसुली अधिकारी | २ | पदवीधर, G.D.C.& A. किंवा शाखाधिकारी पदावरील ५ वर्षाचा अनुभव | १४ | एस-१४- ३८,६०० - १,२२,८०० |
| ३ | शाखाधिकारी | ३ | पदवीधर, G.D.C.& A. असल्यास प्राधान्य | ५८ | एस -१३- ३५,४०० - १,१२,४०० |
| ४ | उपशाखाधिकारी | ३ (अ) | पदवीधर, M.S.C.I.T. | ५८ | एस -०८ -२५,५०० - ८१,१०० |
| ५ | रोखपाल | ३ (अ) | पदवीधर, M.S.C.I.T. | ५५ | एस - ०७ -२१,७००- ६९,१०० |
| ६ | लिपीक | ३ (अ) | पदवीधर, M.S.C.I.T. | ७५ | एस - ०६ - १९,९०० - ६३,२०० |
| ७ | नाईक | ४ | १० वी पास | | एस - ०३ - १६,६०० - ५२,४०० |
| ८ | शिपाई | ४ | १० वी पास | ७५ | एस - ०१ - १५,००० - ४७,६०० |
| **एकुण** | | | | **३३६** | |

संस्थेचे सुधारित कर्मचारी आकृतीबंध व वेतन श्रेणीना चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देणेत आली.संस्थेचे कामकाजाचे स्वरूप व विस्तार पाहता तसेच बहुतांश कर्मचारी हे सेवानिवृत्त झालेले आहेत.तसेच कर्मचारी सेवा प्रवेश,शिस्त व अपिल नियम क्र.५ व ६ नुसार निम्न पदावरील कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठतेनुसार दिलेल्या पदोन्नतीमुळे संस्थेत लिपीक व शिपाई कर्मचाऱ्यांची रिक्त झालेल्या पदांचा विचार करता संस्थेत लिपीक व शिपाई कर्मचारी यांची सरळसेवेने भरती करणे आवश्यक असुन सुधारीत कर्मचारी आकृतीबंधानुसार आज रोजी आवश्यक कर्मचारी संख्या खालील प्रमाणे आहे.

| कर्मचारी तपशिल | व्यवस्थापक | विभा.अधि | शाखाधिकारी | उप शाखाधिकारी | रोखपाल | लिपीक (वर्ग –३) | शिपाई (वर्ग–४) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सुधारीत कर्मचारी आकृतीबंधानुसार पदसंख्या | ०१ | १४ | ५८ | ५८ | ५५ | ७५ | ७५ | ३३६ |
| प्रत्यक्षात कार्यरत पदे कर्मचारी संख्या | ०० | ०४ | ५३ | ५४ | ५९ | ४० | ४४ | २५४ |
| रिक्त पदे कर्मचारी संख्या | ०१ | १० | ०५ | ०४ | ०४ जादा | ३५ | ३१ | ८२ |

वार्षिक सर्व साधारण सभा दिनांक २१/०८/२०१६ मधील ठराव क्र.१३ अन्वये संस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी तयार करणेत आलेल्या कर्मचारी सेवा प्रवेश,शिस्त व अपिल नियमांना म.जिल्हा उपनिबंधक सो.सहकारी संस्था,जळगांव यांचेकडील पत्र जा.क्र.४४०३ युआरबी – २ /ज.जि. सर.नो.सह.पत./जळगांव/कर्म.सेवानियम मंजुरी/२०१८ दिनांक २७/०९/२०१८ अन्वये मान्यता प्रदान करणेत आलेली आहे.तसेच संस्थेचे मंजुर पोटनियम क्र.फ – १.९ मधील "कार्यकारी मंडळाचे कामे व जबाबदाऱ्या" या शिर्षकातील नियम नं. २ अन्वये संस्थेचे सर्व पगारी नोकरांची नेमणुक करणे,वेतन व भत्ते ठरविणे व सेवेत कायम करणे इत्यादी बाबतचे अधिकार कार्यकारी मंडळास प्रदान करणेत आलेले आहे.

मागिल काळात संस्थेचे माजी उपाध्यक्ष व सभासद श्री.विठ्ठल झिपरू पाटील व श्री.अनिल वसंत सुरळकर यांनी संस्थेत सरळसेवेने लिपीक/शिपाई कर्मचारी भरती बाबत म.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांनी त्यांचे कार्यालयाकडून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मागविणेत आली होती.

त्या अनुषंगाने म.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाकडील परिपत्रक जा.क्र./पत/डी ४/कर्मपत सेवानियम/२०१२/५९६ दिनांक १५ मार्च २०१२ चे परिपत्रकाची प्रत संलग्न असुन संस्थेच्या "आदर्श उपविधी" मधील नियम नं.फ १.९ "कार्यकारी मंडळाचे कामे व जबाबदाऱ्या"मधील नियम नं.(२) संस्थेच्या सर्व पगारी नोकरांची नेमणुक करणे,वेतन व इतर भत्ते ठरविणे,सेवेत कायम करणे.त्यांना तात्पुरते कामावरून दुर करणे, दंड करणे किंवा बडतर्फ करणे बाबत तरतुद असुन सर्व साधारण सभेची मंजुरी घेऊन नियम अंमलात आणावेत असे पत्रान्वये कळविले आहे.

संस्थेतर्फे म.विभागिय सहनिबंधक,सहकारी संस्था,नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस सरळ सेवेने कर्मचारी भरती करणे बाबत मार्गदर्शन मागविण्यात आले होते.त्या अनुषंगाने म.विभागिय सहनिबंधक सहकारी संस्था,नाशिक विभाग नाशिक यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र.५१४६ अर्थ–२/जजिसरपत/सरळसेवा/कर्म.भरती/सन २०१८ दिनांक २०/१२/२०१८ अन्वये पगारदार नोकरांच्या पत संस्था नोकरभरती बाबतचे नियम/पात्रता स्वतंत्ररित्या निश्चित केल्याबाबतचे परिपत्रके व शासन निर्णय नाहीत.संस्थेने मागणी केले प्रमाणे पगारदार नोकरांच्या पतसंस्थेत सरळ सेवा भरतीबाबत या कार्यालयात शासनमान्य कंपनीची यादी उपलब्ध नाही.सबब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० त्याखालील नियम,उपविधी आणि सर्वसाधारण नियमानुसार संस्थेने योग्य ती कार्यवाही करावी.असे पत्रान्वये कळविले आहे.

त्याच प्रमाणे म.सहाय्यक आयुक्त (मागास वर्ग कक्ष) नाशिक यांचे कार्यालयाकडून संस्थेची बिंदू नामावली नोंदवही तपासणी बाबत मार्गदर्शन मागविणेत आले होते.त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र जा.क्र.संकीर्ण–२०१७/प्र.क्र.९१/ ब/१६–व दिनांक २७/१०/२०१७ संस्थेस प्राप्त झालेले असुन त्यानुसार सदरहू संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियमान्वये नोंदणीकृत संस्था असुन संस्थेस शासनाकडून कोणत्याही स्वरूपात अनुदान मिळत नाही.तसेच संस्थेत शासन भागधारक नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्य लोकसेवा [(अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती,निरधिसुचित जमाती (विमुक्त जमाती)],भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम २००१ मधील २ (झ) मधील लोकसेवा व पदे या व्याख्येत सदरहू संस्थेची पदे येत नाहीत.यास्तव आरक्षण अधिनियम २००१ मधील तरतुदी या संस्थेस लागु होत नसल्यामुळे संस्थेची बिंदू नामावली तपासुन आरक्षण निश्चिती करण्याची आवश्यकता नाही,असे कळविले आहे.तरी देखील आज रोजी संस्थेत खालील प्रमाणे मागासवर्गीय कर्मचारी कार्यरत आहेत.

| विभा.अधि | शाखाधिकारी | उपशाखाधिकारी | रोखपाल | लिपीक | शिपाई | एकुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | १४ | १७ | १० | १४ | १४ | ७० | २७.६६% |

जळगांव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी लि.जळगांव ही जिल्हास्तरीय कार्यक्षेत्राची संस्था असुन संस्थेची दिनांक ३१/०३/२०२५ अखेरची आर्थिक स्थिती खालील प्रमाणे आहे.

१) सभासद संख्या – ३२,९४२
२) खेळते भांडवल रक्कम रूपये – १२९५.६१ कोटी
३) संस्थेचे वसुल भागभांडवल रक्कम रूपये – १०६.८२ कोटी
४) सभासद वर्गणी रक्कम रूपये – ८८१.८७ कोटी
५) राखीव व इतर निधी तरतुद रक्कम रूपये – ६९.३७ कोटी
६) संस्थेच्या एकुण सभासद ठेवी रक्कम रूपये – १८२.८५ कोटी
७) संस्थेची बॅकेतील शिल्लक व गुंतवणुक रक्कम रूपये – १५२.५५ कोटी
८) कर्ज वाटप रक्कम रूपये – ११२२.४४ कोटी
९) संस्थेची एकुण थकबाकी एन.पी.ए. तक्त्यानुसार रक्कम रूपये ८.३७ कोटी
१०) थकीत कर्ज एन.पी.ए./वसुलीचे प्रमाण –0.७५ %
११) संस्थेचा नफा रक्कम रूपये – १३.५0 कोटी
१२) सभासदांना वाटप लाभांश दर १० % रक्कम रूपये –१०.७३ कोटी
१३) कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या – २५४
१४) सुधारीत कर्मचारी आकृतीबंधानुसार कर्मचारी पदे संख्या –३३६
१५) शाखांची संख्या – ५५
१६) कायम जिंदगी–इमारती संख्या – १९ आणि त्यांचे मुल्य रूपये – ५.४३ कोटी
१७) मागिल ५ वर्षात लेखापरिक्षण वर्ग – सतत “अ” आहे.

संस्थेचे कामकाजाचे स्वरूप व विस्तार पाहता शाखा कार्यालयांच्या दैनंदिन व्यवहारात सुसुत्रता आणुन सभासदांना जलद व तत्पर सेवा उपलब्ध करून देणे करीता रिक्त पदांची भरती करणे आवश्यक आहे.

दिनांक ०१/०४/२०२४ ते दिनांक ३१/०३/२०२५ अखेर संस्थेच्या व्यवस्थापनावरील खर्चाची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | दि.०१/०४/२०२४ ते दि.३१/०३/२०२५ |
|---|---|---|
| १ | कर्मचारी पगार व भत्ते | २१८२४१०८७ |
| २ | संचालक मासिक सभा खर्च व भत्ता | १११३०९९ |
| ३ | लेखापरिक्षण खर्च | ८९१४१७५ |
| ४ | घसारा | ३७०८७७४ |
| ५ | कर व भाडे | ९५७८८५ |
| ६ | दुरध्वनी खर्च | २९१५१0.00 |
| ७ | इतर खर्च | ८७६६१५४.५ |
| ८ | निर्लिखीत खाते | 00 |
| **एकुण व्यवस्थापन खर्च** | | **२४१९९२६८४.५** |
| खेळते भांडवल | | १२९५६१४०३२१.६१ |
| व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | | **१.८७ %** |
| आदर्श प्रमाण | | **२ %चे आत** |

दिनांक ३१/०३/२०२५ अखेर संस्थेचे खेळते भांडवल रक्कम रूपये १२९५,६१,४०,३२१.६१ असुन आर्थिक वर्षात व्यवस्थापनावरील खर्च रू.२४१९९२६८४.५ असुन त्याचे प्रमाण १.८७ % असुन सदरील खर्चाचे प्रमाण हे आदर्श मापदंड ०२.00 % चे आत आहे.संस्थेत लिपीक/शिपाई कर्मचारी भरती केल्यास भविष्यात त्याचा संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर कोणताही विपरित परिणाम होणार नाही.वा.सर्व सा.सभा दिनांक १८/०८/२०२४

मधील मंजुर ठराव क्र.११ च्या नमुद नुसार वरील सर्व बाबीचा विचार करता सहकार कायदा, संस्थेचे पोटनियम व कर्मचारी सेवा प्रवेश,शिस्त व अपिल नियमानुसार संस्थेत एकुण ८२ पदे रिक्त असुन त्यापैकी फक्त लिपीक व शिपाई कर्मचाऱ्यांची रिक्त पदे सरळसेवेने भरती करणे आवश्यक आहे. याबाबत सभेत सखोल व सविस्तर चर्चेअंती असे ठरविणेत आले की,संस्थेचे कर्मचारी सेवा प्रवेश,शिस्त व अपिल नियम नं.७ नुसार सरळसेवेने लिपीक –३५ व शिपाई –३१ पदाची निवड करणे कामी ८ सदस्यीय संचालकांची कर्मचारी निवड समिती तयार करणेत यावी.याबाबतचे आवश्यक ते सर्व अधिकार कार्यकारी मंडळास प्रदान करणेत आलेत.

कर्मचारी निवड समितीने संस्थेचे मंजुर पोटनियम नं.फ–१.९ मधील "कार्यकारी मंडळाचे कामे व जबाबदाऱ्या" या शिर्षकातील नियम नं.२ मध्ये संस्थेचे कर्मचारी नेमणुकी बाबतचे अधिकार कार्यकारी मंडळास आहेत. कर्मचारी सेवा प्रवेश,शिस्त व अपिल नियम क्र.७ नुसार निवड समितीने मुलाखतीव्दारे (Walk in interview) लिपीक व शिपाई पदांची निवड प्रक्रिया पुर्ण करून कार्यकारी मंडळास आपला अहवाल सादर करावा,असे ठरविण्यात आले.

निवड समितीने संस्थेचे कर्मचारी सेवा प्रवेश,शिस्त व अपिल नियमातील नियम ६ मधील कर्मचारी श्रेणी–३(अ) लिपीक या पदासाठी प्रथम नियुक्तीची किमान अर्हता कोणत्याही शाखेचा पदविधर व एम.एस.सी.आय.टी.परिक्षा पास तसेच कर्मचारी श्रेणी–४ शिपाई या पदासाठी प्रथम नियुक्तीची किमान अर्हता इयत्ता १० वी उत्तिर्ण उमेदवार घेणेत यावेत.तसेच नियम नं.९ नुसार संस्थेचे सेवेत नियुक्तीसाठी किमान १८ वर्ष वयोमर्यादा असुन सर्व साधारण वर्गासाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष आहे व मागासवर्गीयांसाठी ४३ वर्ष राहिल.

तसेच कर्मचारी सेवा प्रवेश,शिस्त व अपिल नियम क्र.१२ नुसार सेवकाची प्रथम नियुक्ती ही ६ महिने करीता परिक्षावधीन कालावधीची राहिल.त्या काळातील वेतन कार्यकारी मंडळ ठरविल,परिक्षावधीन कालावधी संपल्यानंतर संबंधीत सेवकाचे कामकाज समाधानकारक असल्यास संस्थेतील नियमीत प्रचलित पदाची वेतनश्रेणी लागू करण्याचे निर्णय कर्मचारी नियंत्रण समितीच्या शिफारशीने कार्यकारी मंडळ घेईल.

सुधारीत आकृतीबंधानुसार संस्थेत रिक्त असलेली लिपीक व शिपाई पदांची सरळसेवेव्दारे निवड प्रक्रिया करतांना शासनमान्य स्थानिक दैनिक वृत्त पत्रातुन जाहिरात प्रसिध्द करणेत यावी.तसेच संस्थेची वेब साईट (संकेत स्थळावर) व नोटीस बोर्डावर देखील सदरील जाहिरात प्रसिध्द करणेत यावी.सरळसेवेने लिपीक व शिपाई कर्मचारी भरती करणे बाबतचे सर्व अधिकार कार्यकारी मंडळास प्रदान करणेत येत आहेत.त्या अनुषंगाने सुधारित कर्मचारी आकृतीबंधानुसार कर्मचारी भरती बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी म.जिल्हा उपनिबंधक सो. सहकारी संस्था,जळगांव यांचेकडेस सादर करणेत यावा.

सुचकः श्री.रविंद्र किशोर सोनवाल
अनुमोदक : श्री.जगदिश परशुराम सैंदाणे
ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र.१२ या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

ठराव :– आज दिनांक २७/०७/२०२५ रोजीचे वार्षिक साधारण सभेस एकुण २८,१४५ क्रियाशिल सभासद हजर आहेत.संस्थेची एकुण सभासद संख्या ३२,९४२ एवढी असुन ४७९७ सभासद सभेस अनुपस्थित आहेत.या बाबत सभेत सखोल व सविस्तर चर्चा करणेत आली.त्यानुसार

संस्थेचे ४५७५ एवढे सभासद अनुपस्थित असुन त्यांची अनुपस्थिती क्षमापित करणेत यावी.असे सर्वानुमते ठरविणेत येवुन त्यास मंजुरी देण्यात आली.

सुचक :— श्री.विपीन वसंतराव पाटील
अनुमोदक :— श्री.सचिन चंद्रकांत पाटील
ठराव : सर्वानुमते मंजुर

**आयत्या वेळेचे विषय :—**

विषय क्र. १३ संस्थेचे लवादी सभासद हे त्यांच्याकडील येणे असलेल्या थकीत कर्जाची रक्कम एकरकमी परतफेड करणेस तयार असल्यास कर्जावरील येणे व्याजास सुट देणे बाबत विचार करणे.

ठराव :— संस्थेचे लवादी सभासद त्यामध्ये परांगदा,अपंगत्व,नोकरीतुन कमी केलेले,दिर्घकाळ निलंबीत,बडतर्फ,आर्थिक नादारी,कौटुंबीक दुरावस्थेमुळे थकीत झालेले कर्जदार यांचेकडील कर्जे,लवाद/न्यायिक सुरू असलेल्या/निर्णय झालेल्या तसेच ( N.P.A.) इ.विविध कारणांनी वसुल न झालेल्या थकीत कर्जाची तरतुद संस्थेस करावी लागत असल्याने पतसंस्थेच्या अनुत्पादक मत्तेत (N.P.A.)वाढ होत आहे.

संस्थेचे चार्टर्ड अकौटंट यांचे अभिप्रायानुसार सन २०२४ – २५ या आर्थिक वर्षाचा Cast of fund (०६.४०%) विचार करता थकीत/लवादी सभासद तडजोडीची रक्कम एकरकमी संस्थेत भरणा करणेस तयार असल्यास कार्यकारी मंडळास ०.६.४० % किंवा त्यापेक्षा अधिक दराने व्याजाची आकारणी करून उर्वरीत येणे व्याजात सुट देण्याची मुभा राहिल.

तथापी कर्ज परतफेडीचा व्याज दर Cast of fund पेक्षा कमी असु नये असे चर्चेअंती सर्वानुमते ठरविण्यात आले असुन याबाबत तडजोडीचे व व्याजात सुट देणे बाबतचे आवश्यक ते सर्व अधिकार कार्यकारी मंडळास प्रदान करण्यात आले.

सुचक :— श्री.प्रशांत रमेश जोशी
अनुमोदक :— श्री.कैलास भिमराव पाटील
ठराव : सर्वानुमते मंजुर

**आयत्या वेळेचे विषय**

विषय क्र.१४ म.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,जळगांव यांनी उपदान (ग्रॅच्युईटी) संबंधी पोटनियम दुरूस्ती नाकारल्याने संस्थेचे कर्मचाऱ्यांना पुर्ववत एका वर्षाच्या सेवाकाळासाठी २२ दिवसाची ग्रॅच्युईटीची रक्कम अदा करणे बाबत विचार करणे.

ठराव :— कार्यकारी मंडळ सभा दिनांक २०/०८/२०२३ मधील ठराव क्र.१३ तसेच वार्षिक सर्व साधारण सभा दिनांक २७/०८/२०२३ मधील ठराव क्र.१६ अन्वये संस्थेच्या कर्मचाऱ्यांना एका वर्षाच्या सेवाकाळासाठी देण्यात येणारी ग्रॅच्युईटीची रक्कम २२ दिवसाऐवजी १६.५० दिवस करणेत आलेली आहे व त्या अनुषंगाने कर्मचारी सेवाशिस्त व अपिल नियम नं.२७ सुधारित करणेत आलेला आहे.

पोटनियमातील किरकोळ या शिर्षकातील ग्रॅच्युईटी बाबत नियम नं.८ वगळणेत येवुन सुधारित पोटनियम दुरूस्ती मंजुरीस्तव म.जिल्हा उपनिबंधक सो.सहकारी संस्था,जळगांव यांचे कार्यालयाकडेस पाठविणेत आलेली होती.सदरील पोटनियम दुरूस्ती म.जिल्हा उपनिबंधक सो.यांचे कार्यालयाकडील दिनांक १०/११/२०२३ रोजीच्या आदेशान्वये नामंजुर केलेली आहे.

सदरील आदेशाला संस्थेने म.विभागिय सहनिबंधक सो.सहकारी संस्था नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस अपिल क्र.ए–०९/२०२४ अन्वये आवाहन केलेले होते.तथापी सदरील अपिल म.विभागिय सहनिबंधक सो.यांचेकडील दिनांक १३/०६/२०२४ चे आदेशान्वये अमान्य करणेत आलेले आहे.

म.विभागिय सहनिबंधक सो.सहकारी संस्था नाशिक विभाग नाशिक यांचेकडील दिनांक १३/०६/२०२४ चे आदेशान्वये अमान्य करणेत आलेल्या निर्णयाविरूध्द संस्थेने मा.ना. सहकार मंत्री सो.महाराष्ट्र राज्य,मंत्रालय मुंबई यांचेकडेस दिनांक २३/०९/२०२४ रोजी रिव्हीजन अर्ज दाखल करणेत आलेला होता.

संस्थेचे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी जुन्या दराने एका वर्षाचा सेवाकाळासाठी २२ दिवसाची ग्रॅच्युईटी रक्कम मिळणे बाबत संस्थेकडेस विनंती अर्ज सादर केल्याने सदर बाबतीत संस्थेचे आर्थिक सल्लागार म.सुरेश एस.पाटील,चार्टर्ड अकौंटंट,जळगांव तसेच संस्थेचे कायदेशिर सल्लागार म.ॲड.विक्रम ए.पवार,जळगांव यांचे कडून मार्गदर्शन मागविणेत येवुन कार्यकारी मंडळ सभा दिनांक २६/०१/२०२५ मधील ठराव क्र.१२ अन्वये संस्थेचे सर्व कर्मचाऱ्यांना एका वर्षाच्या सेवाकाळासाठी २२ दिवसाची ग्रॅच्युईटी देणे बाबत निर्णय कायम ठेवणेत यावा असा सर्वानुमते निर्णय घेणेत आलेला आहे.सदरील ठराव सभेसमोर वाचुन दाखविणेत येवुन त्यावर सखोल व सविस्तर चर्चा करणेत आली.

म.सुरेश एस.पाटील,चार्टर्ड अकौंटंट यांचेकडून आलेले दिनांक ०४/०१/२०२५ रोजीचे मार्गदर्शन सभेसमोर वाचुन दाखविणेत आले.सदरील मार्गदर्शन पत्रात"सुधारित पोटनियम म.जिल्हा उपनिबंधक सो.यांच्या मंजुरी नंतरच अंमलात येतात तोवर पुर्वीचेच पोटनियम लागु राहतील जोवर रिव्हीजन अर्ज संस्थेच्या बाजुने लागत नाही तोपर्यत जुन्या पोटनियमानुसार म्हणजेच एका वर्षाला २२ दिवसाची ग्रॅच्युईटी संस्थेने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अदा करायला हवी.तसेच १६.५० दिवसाची ग्रॅच्युईटी स्विकारलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सुध्दा २२ दिवसाप्रमाणे ग्रॅच्युईटी आकारून फरक अदा करणेत यावा."असे स्पष्ट नमुद केलेले आहे.

संस्थेचे कायदेशिर सल्लागार म.ॲड.विक्रम ए.पवार,जळगांव यांचेकडून आलेले दिनांक १०/०१/२०२५ रोजीचे कायदेशिर मार्गदर्शन सभेसमोर वाचुन दाखविणेत आले. सदरील मार्गदर्शन पत्रात"संस्थेला जुन्या दराने व प्रचलित पध्दतीनुसार एका वर्षाच्या सेवाकाळासाठी २२ दिवसांचा पगार या दराने उपदान देण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आहे.तसेच संस्थेला पोटनियम दुरूस्ती बाबत मंत्रालय मुंबई येथे प्रलंबीत असलेले प्रकरण मागे/काढुन घेण्याचासुध्दा अधिकार आहे.याबाबत कर्मचाऱ्यांच्या एका वर्षाच्या सेवाकाळा साठी २२ दिवसाची ग्रॅच्युईटी अदा करणे बाबत पोटनियम दुरूस्ती तसेच कर्मचारी सेवाशिस्त व अपिल नियमात सुध्दा दुरूस्ती करणेत यावी".असे नमुद केलेले आहे.

संस्थेचे आर्थिक व कायदेशिर सल्लागार यांच्या मार्गदर्शनाचा विचार करता सदरील नियम रद्द करणेत येवुन त्या ऐवजी "संस्थेच्या कायम कर्मचाऱ्यांकरीता ग्रॅच्युईटी देतांना एक वर्षाचा सेवा काळासाठी महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक सेनिवे – २०१९ प्र.क्र.५८ सेवा ४ दिनांक ०१/०३/२०१९ नुसार २२ दिवसाचा पगार ग्रॅच्युईटी म्हणुन अदा केला जाईल.तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास जास्तीत जास्त ३०० दिवस अर्जित रजेचा पगार अदा केला जाईल.निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास त्याच्या नोकरीच्या शेवटच्या दिवशी ग्रॅच्युईटी रक्कम व अर्जित रजेची रक्कम अदा केली जाईल.त्याचे अधिकार म.अध्यक्ष,व्यवस्थापक यांना राहतील."अशी दुरूस्ती कर्मचारी सेवा प्रवेश शिस्त व अपिल नियमात करणेत येत आहे.

संस्थेच्या प्रगतीत सभासदांबरोबर कर्मचाऱ्यांचे देखील योगदान असते त्यामुळे सभासद हिताबरोबरच कर्मचाऱ्यांचे देखील हित जोपासणे ही बाब देखील महत्वाची आहे.सन २०२३ पुर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना एका वर्षाच्या सेवाकाळा साठी २२ दिवसाची ग्रॅच्युईटी अदा करणेत आलेली आहे त्यानुसार मानवतेच्या दृष्टीकोणातुन विचार होवुन सन २०२३ नंतर सेवानिवृत्त झालेले तसेच पुढे सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना देखील एका वर्षाच्या सेवेसाठी २२ दिवस याप्रमाणे ग्रॅच्युईटीची रक्कम अदा करणेस चर्चेअंती सर्वानुमते मंजुरात देणेत आली.

माहे नोव्हेंबर २०२३ पासुन सेवानिवृत्त झालेले कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युईटी रक्कम अदा करतांना मागिल देणे रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देणेत येवु नये.असे देखील ठरविणेत आले.ग्रॅच्युईटीची रक्कम अदा करणे बाबतचे अधिकार मे.कार्यकारी मंडळास प्रदान करणेत आलेत.

सुचक :— श्रीमती वर्षा जिजाबराव पवार
अनुमोदक :— श्री.महेश भटु शिंदे
ठराव : सर्वानुमते मंजुर

**आयत्या वेळेचे विषय**

विषय क्र. १५ संस्थेचे अनियमीत व सतत गैरहजर राहणारे कर्मचाऱ्यांबाबत विचार करणे.

ठराव :— संस्थेचे काही कर्मचारी हे कोणत्याही प्रकारचा रजेचा अर्ज न देता परस्पर अनाधिकृतपणे गैरहजर असतात.कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीमुळे कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण होऊन संस्थेचे आर्थिक व्यवहारावर परिणाम होत असतो.वारंवार रजेवर गेल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या रजा शिल्लक नसल्याने त्यांच्या रजा हया बिनपगारी केल्या जातात.

सदर बाबतीत सभेत सविस्तर चर्चा करणेत आली.ज्या कर्मचाऱ्यांची एका वर्षात दोन महिने (६० दिवस) बिनपगारी रजा झालेली असल्यास अथवा जो कर्मचारी दोन महिने (६० दिवस) सतत गैरहजर असेल त्यांना दोन वर्ष पावेतो संस्थेचे कोणत्याही प्रकारचे कर्ज अदा करणेत येवु नये.तसेच त्यांचे जामिनदारांचे कर्ज वितरण थांबविणेत यावे.असे चर्चेअंती ठरविणेत आले.

तथापी स्वतःचे आजारपण तसेच स्वतःच्या कुटुंबातील विवाह/मृत्यु आदी कार्य इत्यादी कारणांमुळे कर्मचाऱ्याची झालेली गैरहजेरी/बिनपगारी याबाबत कर्मचाऱ्याने दिलेले कारण प्रशासनास सबळ व सयुक्तीक वाटल्यास कर्ज अदा करणे बाबतचा निर्णय घेईल.तसेच सतत गैरहजर व अनियमित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कर्मचारी सेवा शिस्त व अपिल नियमातील तरतुदी नुसार कार्यवाही करणेत यावी.असे देखील ठरविणेत आले.

सुचक :— श्री.अनिल रामदास चौधरी
अनुमोदक :— श्री.अजित शहा अमित शहा
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र. १६ संस्थेचे थकबाकीदार सभासदांकरीता सुरू असलेल्या संजिवनी योजनेस मुदतवाढ देणे तसेच संस्थेचे थकबाकीदार व मयत सभासदांचे शासकिय/निमशासकिय सेवेत कार्यरत असलेले वारसांना संस्थेचे सभासद करून त्यांचेकडून थकबाकी वसुली करणे बाबत विचार करणे.

ठराव :— संस्थेचे थकबाकीदार सभासदांचे वर्गणी खर्ची पडलेले खाते पुनर्जिवीत करणे करीता 'संजिवनी योजना' राबविणेत आलेली आहे.सदरील योजनेस मुदत वाढ देणे बाबत सभेत सविस्तर चर्चा करणेत आली.

सभासदांचे विविध अपरिहार्य कारणांमुळे वसुल न झालेल्या थकीत कर्जाची तरतुद संस्थेस करावी लागत असल्याने पतसंस्थेच्या अनुत्पादक मत्तेत (N.P.A.)वाढ होत आहे.संस्थेची थकबाकी वसुल होणेचे दृष्टीने सदरील संजिवनी योजनेस अटी व शर्तीसह मुदत वाढ देणेत यावी.असे चर्चेअंती सर्वानुमते ठरविणेत आले.

तसेच संस्थेचे थकबाकीदार व मयत सभासदांचे शासकिय/निमशासकिय सेवेत कार्यरत असलेले वारसांना संस्थेचे सभासद करून त्यांचेकडून थकबाकी वसुल करणे बाबत सभेत सविस्तर चर्चा करणेत आली.

संस्थेचे थकीत कर्ज वसुल होणे ही बाब संस्थेचे आर्थिक हित विचारात घेता संस्थेचे थकबाकीदार व मयत सभासदांचे शासकिय/निमशासकिय सेवेत कार्यरत असलेले वारसांना संस्थेचे सभासद करून त्यांचेकडून थकबाकी वसुल करणेत यावी,असे सर्वानुमते ठरविणेत आले.

तथापी सदरील योजनेचा लाभ घेणाऱ्या सभासदास १ वर्ष पावेतो नियमित कर्ज परत फेड केल्यानंतरच सभासदाची कर्ज फेडीची क्षमता विचारात घेवुन सभासदास कर्ज नुतनीकरण करता येईल.सदरील योजनांची मुदत ही दिनांक ३१/०८/२०२६ पावेतो राहिल.या बाबतचे आवश्यक ते सर्व अधिकार मे.कार्यकारी मंडळास प्रदान करणेत आलेत.

सुचक :– श्री.अ.हमीद रहेमान पटेल
अनुमोदक :– श्री.अशोक बाजीराव पाटील
ठराव : सर्वानुमते मंजुर

येणे प्रमाणे सभेचे कामकाज होवुन म.अध्यक्ष सााे.यांनी उपस्थितांचे तसेच सभेस नुतन मराठा महाविद्यालयाचे सभागृह वापरावयास दिल्याने संस्था चालकांचे आभार मानले.राष्ट्रगीत होवुन सभा संपल्याचे जाहिर केले.

स्वाक्षरी – XXX
अध्यक्ष
ज.जि.सर.नो.सह.पत.लि.जळगांव

जळगांव
दिनांक : २७/०७/२०२५